## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०८.०४.२०१७ ०४.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०७.०४.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे चिकलठाणा:—** गुरन I १४३/१७ कलम ३०४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सर तर्फे काशीनाथ भिमराव लुटे वय ५२ वर्ष व्यवसाय नौकरी पोह/८३७ पोस्टे चिकलठाणा यांनी फिर्याद दिली की दिनांक २४.१२.२०१६ रोजी १२.००वा. दरम्यान यातील नमुद आरोपी नामे रामु हरीचंद्र शिंदे रा.भिंदोन ता.जि. औरंगाबाद याने बेकायदेशीररित्या त्याचे पिकाचे संरक्षणासाठी लाकडी दांडे पिकाचे चहु बाजुस लावुन त्यास तार गुंढाळुन त्यामध्ये रात्रीचे वेळेस करंट सप्लाय सोडल्याने यातील मयत नामे काकासाहेब रामेश्वर शिंदे रा. भिंदोन ता.जि. औरंगाबाद हा आरोपीचे शेताकडुन रात्रीचे वेळेस तार न दिसल्याने तारेतील विद्युत प्रवाहाचा शॉक लागल्याने तो मरण पावला सदर घटनेस आरोपी जबाबदार असल्याने आ.मृ. नंबर ९५/१६ चे तपासावरून गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. ताईतवाले सपोनि पोस्टे चिकलठाणा हे करीत आहे.

**०२) पोस्टे अजिंठा:—** गुरन I ११७/१७ कलम ३०४(अ) २७९भादवि सहकलम १३४/१७७ मोवाका नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सुरेश पांडुरंग जिरी वय ३१ वर्ष व्यवसाय शेती रा. तोंडापुर ता. जामनेर जि. जळगाव यांनी फिर्याद दिली की दिनांक ०२.०४.२०१७ रोजी १९.००वा. दरम्यान यातील अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन यातील मयत नामे दादाराव पांडुरंग जिरी रा. तोंडापुर ता. जामनेर जि. जळगाव जोराची धडक देवुन

किरकोळ व गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला व अपघाताची खबर पोस्टेला न देता निघुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास मपोह/१२२६ वाकीकर पोस्टे अजिंठा हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे खुलताबादः—** आ.मृ. नंबर १९/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार सफौ एन. के. बुट्टे नेमणुक पोस्टे सातारा औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे कप्पाबाई धुळाराम लकवाल वय ६५ वर्ष रा. तळयाची वाडी ता. खुलताबाद ही दिनांक ०४.०४.२०१७ रोजी १७.३०वा. तळयाची वाडी येथे राहते घरी चुलीवर चहा करीत असताना पेटलेल्या चुलीवर साडीचा पदर पडुन जळुन भाजल्याने तीस बेंबडे हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार कामी दाखल केले उपचार चालु असताना ती ०५.०४.२०१७ रोजी ०८.३०वा. मरण पावली म्हणुन आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९४९ तांबे पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

**मुंबई दारूबंदी कायदाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला २६ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ३० ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन २२८२०/—रू. किं देशीदारू च्या ४४९ बाटल्या १८० मिलीच्या, तसेच ५३४ ली. गावठी हातभट्टीची दारू किं. ९४००/—रू. तसेच विदेशी दारूच्या १९८ बाटल्या ज्यात १८० मिलीच्या, ३७० मिलीच्या, किमती २१७२५/—रू. असा एकुण ५३९४५/—रू.किं. माल जप्त करण्यात आला आहे.

**मुजुकाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०२ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे १० ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन १००९०/—रू. किं. नगदी रूपये, व जुगाराचे साहीत्य असा जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री सफौ पुरी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण